# व्हॅलेंटाईन दिनानिमित्त

मी तुला पाहताना, असेच हासताना
मनातले तराणे, चेहऱ्यावरी उमटताना

तुझ्या विचारात मी, सदेह गुंफताना
विसरलो भान सारे, तुझे हास्य स्मरताना

दिसतो एकटा फिरता, असेच भरकटताना
सावलीसम तू जोडीस, ते प्रेम विस्तारताना

विस्मरलो सारे, न फुलती इतर भावना
देहास आचार नुरला, तुझा विरह साहताना

आधीचे माझे प्रयास, चेहरा आरशात खुलवताना
तो आरसाही भासे पृष्ठ, चेहरा माझा न्याहाळताना

पाहिले आरशास त्या, असेच भुरळताना
चेहरा माझाच असला, तरी तुलाच रेखाटताना

ऐकिले आहे मी प्रेमात, बहुतांस बहरताना
लोक बोलतात काहीबाही, आजकाल मला वर्णिताना

श्रावण बरसोनी आहे, ही धरा फुलवताना
मी चातक बनून आहे, तुझी वाट पाहताना

**- सचिन पु. कुलकर्णी ( पुणे)**